# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.07.2025** **वार-मंगळवार**

---

**अमित शहा**

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा येत्या 3 आणि 4 जुलै रोजी पुणे दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम होणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचं साम्राज्यात रुपांतर करणारे अजेय योद्धा थोरले बाजीराव पेशवे यांचा अश्वारूढ पुतळा खडकवासला इथल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये उभारण्यात आला आहे. या पुतळ्याचं अनावरण येत्या शुक्रवारी केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे.

**संग्रहालय**

पुण्यातील राजा दिनकर केळकर संग्रहालयाच्या विस्तारित कामाला गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत मंत्रालयात बैठक पार पडली. पुण्यातील बावधन इथल्या 6 एकर जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचं भव्य संग्रहालय उभारण्यासाठी नामांकित स्थापत्यशास्त्रज्ञाची नेमणूक करण्यासाठी प्रशासकीय समितीची स्थापना, सविस्तर आराखड्यानंतर निधीची तरतूद, तसंच नव्याने उभारल्या जाणाऱ्या 'म्युझियम सिटी'ला राजा दिनकर केळकर यांचंच नाव कायम ठेवण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला, अशी माहिती आमदार हेमंत रासने यांनी दिली आहे.

**विश्रामबाग वाडा**

शहराचा ऐतिहासिक वारसा असलेला विश्रामबागवाडा जुलैअखेरपर्यंत नागरिकांसाठी खुला करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. गेल्या काही वर्षांपासून विश्रामबागवाडा दुरुस्तीच्या कामासाठी बंद आहे. विश्रामबाग वाड्याच्या जतन आणि संवर्धनाचं काम गेली दोन वर्षे महापालिकेच्या वारसा विभागाच्या माध्यमातून सुरू आहे. या कामाला विलंब होत असल्याचा आरोप करत काम पूर्ण न केल्यास आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल, असा इशारा क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप खर्डेकर यांनी महापालिका प्रशासनाला दिला होता. त्यानंतर प्रशासनाने हे काम तातडीने पूर्ण

करण्याचं नियोजन केलं आहे. जुलैअखेर वाड्याचा दर्शनी भाग नागरिकांसाठी खुला करण्यात येईल, असं महापालिकेच्या वारसा विभागाचे उपअभियंता सुनील मोहिते यांनी सांगितलं आहे, अशी माहिती खर्डेकर यांनी दिली.

**<u>कर संकलन</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागाने 2025-26 या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये 522 कोटी 72 लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. महापालिकेच्या इतिहासात प्रथमच पहिल्या तिमाहीत कर वसुलीचा पाचशे कोटी रुपयांचा आकडा महापालिकेने पार केला आहे. नागरिकांनी वेळेत मालमत्ता कर भरावा, यासाठी कर संकलन विभागानं 30 जूनपर्यंत विविध सवलती जाहीर केल्या होत्या.

**<u>दिवाळी अंक</u>**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारे दिवाळी अंक म्हणजे मराठी संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे, असं प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक आणि माजी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी पुण्यात केलं. छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक प्रदर्शनाचं उद्घाटन आज मोरे यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. हे प्रदर्शन येत्या शुक्रवारपर्यंत सकाळी 11 ते रात्री 8 या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुलं असेल.

**<u>एसटी-प्रताप सरनाईक</u>**

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर इथं विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या 5 हजार 200 बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक आणि बसची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी, या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक अधिकारी यांच्या चहा, नाश्ता आणि जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

**<u>कॅज्युअल रिपोर्टर</u>**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागामध्ये कॅज्युअल रिपोर्टर या अस्थायी पदासाठी सूचि तयार करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख 20 जुलै आहे. सविस्तर माहिती आणि अर्ज करण्यासाठी applications डॉट prasarbharati dot org आणि News on AIR या संकेतस्थळाला भेट द्यावी. वृत्त विभागाच्या 020-255 10 506 या क्रमांकावर देखील संपर्क साधता येईल.

**<u>प्रारूप आराखडा</u>**

पुणे जिल्हा परिषद, आणि पंचायत समितीच्या प्रभाग रचना म्हणजेच गट आणि गण तयार करण्याचं काम जिल्हा प्रशासनानं सुरू केलं आहे. लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती आणि आरक्षणाचे निकष लक्षात घेऊन याबाबत प्रारूप आराखड्याचं काम सुरू आहे. संबंधित तहसीलदार प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा 14 जुलै रोजी पूर्ण करून तो जिल्हा प्रशासनाकडे देतील; त्यानंतर 21 जुलैपर्यंत जिल्हाधिका-यांकडे हरकती आणि सूचना सादर करता येणार आहेत.

**<u>शाळाबाह्य शोधमोहीम</u>**

राज्यातील 3 ते 18 वर्षे वयोगटांतील शाळाबाह्य, अनियमित आणि स्थलांतरित बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांचं शिक्षण अबाधित ठेवण्यासाठी 1 ते 15 जुलै या कालावधीत विशेष शोधमोहीम राबवण्यात येणार आहे. त्यासाठी शालेय शिक्षण विभागाने एक नियमावली निश्चित केली आहे. राज्यातील सर्व विभागांमध्ये ही सर्वेक्षण मोहीम प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिल्या आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 28 तर किमान तापमान 21 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. आज दिवसभर ढगाळ हवामान होतं; उद्याही शहर परिसरात आकाश ढगाळ राहून हलका पाऊस पडेल तर घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**